म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १८६८

# मीरा



REFBK-0014822
REFBK-0014822

मीरा

मंगेश पाडगांवकर
यांचीं पुस्तकें

| | |
|---|---|
| धारानृत्य | १९५० |
| जिप्सी | १९५३, १९५९ |
| छोरी | १९५७ |
| निंबोणीच्या झाडामागें | १९५४, १९५८ |
| शर्मिष्ठा | १९६० |
| उत्सव | १९६२ |
| वात्रटिका | १९६३ |
| भोलानाथ | १९६४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# मीरा

मंगेश पाडगांवकर

REFBK-0014822
REFBK-0014822

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 78122

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© मंगेश पाडगांवकर

पहिली आवृत्ति
ऑगस्ट १९६५
श्रावण १८८७

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४ BR

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

रावसाहेब पटवर्धन यांस
प्रेमादरपूर्वक ....

## अनुक्रम

१. मैं गिरिधर के घर जाऊं २०
२. पग घुंघरू बांधि मीरा नाची रे २०
३. मैं जाण्यो नाहीं प्रभु को मीलण कैसे होय री २२
४. भज मन चरणकमल अविनासी २२
५. मेरे तो गिरधर गोपाल दूसरो न कोई २४
६. घडी एक नहिं आवडे तुम दरसण बिन मोय २४
७. प्यारे दरसण दीज्यो आय तुमबिन रह्यो न जाय २६
८. राम मिलण के काज सखी मेरे आरति उर में जागी री २६
९. बसो मोरे नैनन में नंदलाल २८
१०. देखो सहियां हरि मन काठो कियो २८
११. जोगियारी प्रीतडी है दुखडा री मूल ३०
१२. परम सनेही राम की निति ओलूं री आवै ३०
१३. हेरी मैं तो दरद दिवाणी होई दरद न जाणै मेरो कोई ३२
१४. पतियां मैं कैसे लिखूं लिखिही न जाइ ३२
१५. ऐसी लगन लगाइ कहां तूं जासी ३४
१६. तुम्हरे कारण सब सुख छांड्या ३४
१७. गावे राग कल्याण मोहन गावे राग कल्याण ३६
१८. भजन भरोसे अविनाशी मैं तो भजन भरोसे अविनाशी ३६
१९. म्हारा ओगलिया घर आया जी ३८
२०. तुमबिन मोरी कौन खबर ले गोवरधन गिरिधारी रे ३८
२१. यदुवर लागत है मोहिं प्यारो ४०
२२. माई म्हांने सुपने में बरी गोपाल ४०
२३. हरि मेरे जीवन प्रान-अधार ४२
२४. मोहि लागी लगन हरिचरनन की ४२
२५. छांडो लंगर मोरी बाहियां गहौ ना ४४
२६. जावा दे गुमानी कृष्ण म्हांरे घर काम छे ४४
२७. तुम सुनो दयाल म्हांरी अरजी ४६

२८. बता दे सखी सांवरियां को डेरो कित दूर ४६
२९. कृष्ण करो जजमान प्रभु तुम कृष्ण करो जजमान ४८
३०. प्रभुजी मन माने सब तार ४८
३१. पिय बिन सूनौ छै जी म्हांरो देस ५०
३२. छोड मत जाज्यो जी महाराज ५०
३३. जोगियासे प्रीत किया दुख होइ ५२
३४. करना फकिरी तो क्या दिलगीरी सदा मगन मन रहना रे ५२
३५. वाल्हा मैं बैरागिण हूंगी हो ५४
३६. मैं तो राजी भई मेरे मन में ५४
३७. बादल देख डरी हो स्याम मैं बादल देख डरी ५६
३८. सुनी हो मैं हरि आवन की आवाज ५६
३९. सखी री मोहिं लाज बैरिन भई ५८
४०. मै बिरहणी बैठी जागूं ५८
४१. अंखिया हरिमीलनकी प्यासी ६०
४२. नींद नहीं आवे जी सारी रात ६०
४३. सखी मेरी नींद नसानी हो ६२
४४. पियाजी म्हांरे नैणां आगे रहज्यो जी ६२
४५. बदरा रे तूं जल भारि ले आयो ६४
४६. थे तो पलक उघाडो दीनानाथ मै हाजिर नाजिर कब की खडी ६४
४७. माई मैं तो लियो रमैयो मोल ६६
४८. जागो बन्सीवारे ललना जागो मोरे प्यारे ६६
४९. चलो मन गंगा जमना तीर ६८
५०. कोई स्याम मनोहर ल्योरी सिर धरैं मटकिया डोलै ६८
५१. होजी हरि कित गये नेह लगाय ७०
५२. नैणा लोभी रे बहुरि सके नहिं आइ ७०
५३. जोगिया जी छाइ रह्या परदेस ७२
५४. रामनामरस पीजै मनुआ रामनामरस पीजै ७२
५५. भवनपति तुम घरि आज्यो हो ७४
५६. दरसबिन दूखण लागै नैण ७४
५७. गोहनें गुपाल फिरूं ऐसी आवत मन में ७६
५८. तनक हरि चितवौजी मोरी ओर ७६
५९. गली तो चारों बंद हुई मैं हरिसे कैसे मिलूं जाय ७८
६०. सावण दे रह्या जोरा रे घर आयो जी स्याम मोरा रे ७८

# प्रस्तावना

मला माहीत असलेल्या सर्व संतांमधें तुकाराम आणि मीरा या दोघांविषयीं मला असाधारण आकर्षण आहे. तसें पाहिलें तर दोघांची विभूति अगदींच निराळी. दोघांचा जीवनक्रम अगदीं भिन्न. जीवनसंस्कारांमधें कसलेंच साहश्य नाहीं. तरीहि अनन्यभक्तीमधें, आणि त्याहून विशेष म्हणजे स्वतःच्या अनुभूतिविषयीं अपार निष्ठा बाळगण्यामधें, दोघांमधें साम्य अद्भुत आहे. स्वानुभूतिनिष्ठा या दोघांनीं जितकी दाखवली तितकी दाखवण्याचे प्रसंग इतरांवर आले नसतील, किंवा इतर संतांना एक विशिष्ट 'मिशन' चिकटल्यामुळें त्यांना त्या मिशनलाच प्राधान्य द्यावें लागलें असेल, म्हणून त्यांना आपल्या अनुभूतीला कमीअधिक मुरड अभावितपणें घालावी लागली असेल. पण या दोघांनीं ज्यावेळीं जें पटलें किंवा जेव्हां जी अनुभूति झाली तिच्याशीं निष्ठा बाळगण्यापेक्षां श्रेष्ठ कर्तव्य किंवा मिशन मानलें नाहीं. तुकारामानें स्पष्टच म्हटलें आहे, 'सत्य असत्यासी मन केलें ग्वाही। मानियलें नाहीं बहुमता'. जेव्हां तुकाराम म्हणतो, 'लोक जैसा ओक धरितां धरवेना' तेव्हां लॉर्ड मोर्लेची प्रख्यात कंडिका आठवते. ते म्हणतात, लोकमताची अशी कोणती महती आहे कीं ज्यासाठीं मनुष्यानें आत्मानुभूतीशीं प्रतारणा करावी? एवढें म्हणून त्यांनीं लोकमत कसें उथळ असतें, सत्य ज्ञानापुढें तें किती तुच्छ असतें, याचें मोठें वक्तृत्वपूर्ण वर्णन केलें आहे. इंग्रजी साहित्यांत त्या कंडिकेची महती पुष्कळांनीं गायिली आहे. तुकारामानें लोकमताविषयींची स्वतःची चीड एका शब्दांत व्यक्त केली आहे : 'लोक जैसा ओक धरितां धरवेना'. मीरेचीदेखील हीच वृत्ति अथपासून इतिपर्यंत दिसून येते.

भारताच्या इतिहासांत आणि संतजीवनाच्या जगांत मीरेचें स्थान अद्वितीय आहे. तिच्या नांवाचादेखील इतिहास सांपडत नाहीं. मीरा हें कांहीं हिंदु नांव

नव्हे. पुष्कळ लोक म्हणतात कीं हें मुसलमान नांव आहे. दोन्ही बाजूंना आपली उपपत्ति मारूनमुटकून लावावी लागते. तिचें एकादें दुसरें नांव होतें असाहि कोठें पुरावा नाहीं. हें नांव विचित्र आहे असेंहि त्यावेळीं कुणाला वाटलेलें नाहीं. माहेरीं किंवा सासरीं राजस्थानांत, व्रजभूमींत, किंवा गुजराथेंत मीरा एकाच नांवानें प्रख्यात आहे. आणि हें नांव लोकांना इतकें रुचलेलें आहे कीं आसेतुहिमाचल सर्वच प्रांतांत लोक मोठ्या आदरानें मुलींना मीरा हें नांव ठेवतात. एका इंग्रजानें शोध लावला आहे कीं हिंदुस्थानांत मीरा हें नांव फक्त गणिकांना आणि कलावंतांना देण्यांत येतें. इंग्रज लोक जेवढा शोध लावतील तेवढा थोडा !

मीरेचा जन्म एका राजकुळांत झालेला; आणि तिचें लग्न तर राजस्थानांतील थोरांत थोर कुळांत झालेलें. माहेरीं किंवा सासरीं वैभवाचा तोटा नव्हता; आणि तिनें संस्कारसमृद्धि मिळवण्यांत कसलाच हलगर्जीपणा केलेला नाहीं. तिच्या काळचें संतसाहित्य तिला मुखोद्गत होतें, हें तिच्या शैलीवरूनच स्पष्ट होतें. आध्यात्मिक आणि पौराणिक साहित्याशीं तिचा चांगला परिचय होता. निसर्गानें जसें तिला रूपलावण्य दिलें होतें तसें कंठाचें माधुर्यहि दिलें होतें, आणि संगीतकलेंत ती चांगलीच निष्णात होती.

मीरेचा गुरु कोण याची बरीच चर्चा चालते, आणि या चर्चेला उपयोगी मसाला तिच्या नांवावर खपणाऱ्या मीरा-साहित्यांत पुरेसा मिळतोदेखील. कोणी म्हणतात, ती रैदासांची शिष्या होती. कोणी म्हणतात, तिनें एकदां तुळशीदासाचा सल्ला घेतला होता. तसें पाहिलें तर मीरेला लहानपणापासूनच गिरिधरनागरचा छंद लागला होता. एका साधूकडून लाडानें किंवा हट्टानें मिळविलेल्या मुरलीधराच्या मूर्तीलाच तिनें आपलें सर्वस्व मानलें होतें. ती मूर्तीच तिचा पति, आणि ती मूर्तीच तिचा गुरु. त्या मूर्तीला साक्षी ठेवूनच तिनें हृदयस्थ नारायणाकडून प्रेमसाधनेची अगदीं बालपणींच दीक्षा घेतली होती. अगदीं बालपणापासून शेवटच्या घडीपर्यंत मीरेनें आपली प्रेमसाधना एकनिष्ठेनें चालवली; पण तिच्यामध्यें समन्वयवृत्ति असल्याकारणानें तिनें कधींहि तुळशीदासासारखा हेकेखोरपणा केला नाहीं कीं, हे द्वारकाधीशा, तूं जर धनुष्यबाण हातीं घेऊन राम बनशील तरच तुझ्यापुढें मी माझें डोकें वाकवीन. मीरेच्या वाणीमधें कृष्ण आणि राम यांच्यांत भेद नव्हता. हें तर राहोच, पण असें दिसून येतें कीं, तिनें आपल्या जीवनांत आणि आपल्या प्रवासांत जे जे म्हणून निरनिराळ्या पंथांचे अधिकारी साधू भेटले त्यांच्याकडून त्यांची साधना समजावून घेऊन ती अजमावून पाहिली होती. मीरेच्या जीवनांत आणि कवनांत अनेक साधना डोकावून जातात. प्रेमभक्तीच्या जोडीला कधीं

ज्ञानसाधना येते तर कधीं वैराग्यसाधना. कधीं उपासना, तर कधीं योग. सगळे प्रकार तिनें आपल्या प्रेमसाधनेच्या कसोटीवर कसून पाहिलेले दिसतात. आणि आजच्या युगांतील रामकृष्ण परमहंसांप्रमाणें तिनें सर्व साधना कसून पाहिल्यानंतर ठरवलें कीं सगळ्याच साधना आपापल्या मार्गानें पण एकाच मुक्कामावर पोहोंचतात. पण मीरेला साधनेशीं कर्तव्य नव्हतें. तिला तिच्या हृदयाचा स्वामी गिरिधर गोपाळ याचा साक्षात्कार हवा होता. आणि जर दंतकथांवर विश्वास ठेवायचा असेल, तर तिच्या आजन्म चालवलेल्या साधनेच्या शेवटीं तिला सर्वोत्कृष्ट सायुज्यमुक्तिच मिळाली.

आपल्या पुराणांनीं भक्तिमार्गाची परिणति म्हणून चार प्रकारची मुक्ति सांगितली आहे. वैष्णवाला प्रथम मुक्ति मिळते ती सलोकतेची. ज्या लोकांत विष्णु भगवान राहतात त्या वैकुंठांत रहाण्याची संधि मिळाली म्हणजे सलोकता प्राप्त झाली. त्यानंतर येते समीपता. श्रीविष्णूच्या आसपास राहून त्याची सेवा करण्याची संधि मिळणें ही झाली समीपता. यापुढें श्रीविष्णूजवळ राहिल्यानें भक्ताचें रूप अगदीं भगवंतासारखें होऊन जातें, पहाणाऱ्याच्या नजरेस भक्त कोण आणि भगवंत कोण याचा भेद कळत नाहींसा होतो. ही झाली सरूपता. आणि शेवटची मुक्ति म्हणजे भगवंताच्या शरीरांतच मिसळून एकरूप होण्याची. असें सांगतात कीं मीरेला जेव्हां कुटुंबी जनांकडून घरीं परत येण्याचा आग्रह होऊं लागला आणि जेव्हां तिनें पाहिलें कीं आतां दुसरा उपाय उरला नाहीं व आपलें अवतारकार्यहि पुरें झालें आहे तेव्हां तिनें मंदिरांत जाऊन भगवंताची प्रार्थना केली कीं, मला आतां पोटांत घे. गिरिधर गोपाळानें आपली छाती उघडून तिला पोटांत घेतलें. हा सर्व प्रकार पाहून आश्चर्यचकित, दिङ्मूढ झालेल्या पुजाऱ्यांनीं तिला "वाचवण्याचा" प्रयत्न केला तेव्हां त्यांच्या हातीं मीरेच्या साडीचा पल्लवच तेवढा लाभला. मीरेला अक्षरशः सायुज्यमुक्ति मिळाली.

मीरेच्या या अद्भुत जीवनांताचा विचार करीत असतांना कोणाहि महाराष्ट्रीय मनुष्याला कान्होपात्रेचें स्मरण झाल्यावांचून रहाणार नाहीं. मीरा राजकन्या, राजपत्नी, राजेश्वरी होती. याच्या उलट, बिचारी कान्होपात्रा एका गणिकेची मुलगी. आइनें तिला वयांत येतांच राजदरबाराचा परिचय करून देण्याचा विचार केला. तिनें दृढतापूर्वक त्या सूचनेला विरोध केला. "तूं इतकी सुंदर आहेस, गुणी आहेस—कोणताहि राजा तुला जवळ करील," या आईच्या युक्तिवादाला तोंड देतांना तिनें म्हटलें, "तर मग माझ्याहून सुंदर आणि गुणी असाच नवरा शोधून पहा. मला तर ईश्वरावांचून कुणाशींच लग्न लावायचें नाहीं." आई शहाणी होती. तिनें

मुलीवर जबरदस्ती करण्याचा विचार केला नाहीं. पुढें कान्होपात्रा वारकरी संतांबरोबर पंढरपूरला गेली, आणि मंदिरांत गाऊन कीर्तन करूं लागली.

कुठल्याशा (विजापूर अथवा बेदर) बादशहाला कान्होपात्रेची बातमी लागली. त्यानें तिला आणण्यासाठीं माणसें पाठविलीं. तिनें नाहीं म्हटलें तेव्हां तिला जबरदस्तीनें नेण्याची तयारी केली. वेश्येच्या मुलीचें रक्षण कोण करणार? ती म्हणाली, "मंदिरांत जाऊन विठोबाचा निरोप घेऊन येतें." ती आंत गेली आणि तिनें देवाच्या चरणीं देह ठेवला. आजदेखील पंढरपूरला देवळाच्या उजव्या बाजूला, तरटाच्या झाडाखालीं कान्होपात्रेची मूर्ति पाहायला मिळते. भारतामध्यें स्त्रियांना ईश्वराचाच आधार शोधावा लागतो ही आपली संस्कृति.

मीरेच्या भक्तिकाव्यामध्यें तल्लीन झालेला आपला समाज मीरेच्या जीवनाच्या कारुण्याचा पुरेसा विचार करीत नाहीं. आणि म्हणूनच, मीरा ही स्त्रीजातीच्या आध्यात्मिक स्वातंत्र्यासाठीं निर्धारानें लढणारी अद्वितीय सत्याग्रही होती या गोष्टीचें महत्त्व कोणींहि ध्यानांत घेतलें नाहीं.

मीरा लहान असतांनाच तिनें गिरिधर गोपाळाच्या मूर्तीशीं आपलें मानसिक लग्न लावून घेतलें होतें. घरीं आई किंवा वडील नव्हते. आजोबांनीं तिची भावना हा पोरपणाचा हट्ट आहे असें धरून चालून तिचें एका थोर कुळांत लग्न लावून दिलें. लग्नाचे सोहाळे संपण्यापूर्वीच सासूशीं तिचा खटका उडाला आणि तोदेखील कुलधर्माच्या बाबतींत. सासू म्हणाली, "कुलदेवीला नमस्कार कर." मीरा म्हणाली, "मी फक्त गिरिधर गोपाळालाच नमस्कार करूं शकतें." तिला निराळ्या महालांत ठेवण्यांत आलें. तिच्या वाट्याला ही इष्टापत्तीच होती. तिनें साधुसंतांना घरीं बोलावून उघडपणें भजनकीर्तनांत गाण्याचा आणि नृत्य करण्याचा प्रघात सुरू केला. नवरा तिच्याशीं कसा वागला याचा तिच्या इतिहासांत उल्लेख नाहीं. पुढें लवकरच नवरा वारला आणि मीरेच्या दिराने तिला कह्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला.

मीरेच्या आध्यात्मिक जीवनाची कदर करणारें आजचें जग मीरेचा घरीं छळ कसा झाला याचें रसाळ वर्णन करतें;—पण मला वाटतें, कीं मीरेची तिच्या नवऱ्यानें आणि सासूनें थोडीफार कदरच केली. पुढें जेव्हां घरच्या लोकांना वाटलें कीं मीरेचें वागणें राजकुळाच्या इभ्रतीला बट्टा लावणारें आहे तेव्हां त्यांनीं मीरेचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगांत सर्वच देशांत विषप्रयोगाचा इलाज अजमावण्यांत येत असे. ग्रीममधें सॉक्रेटीसला, रोममधें सीनेकाला आणि भारतांत कृष्णाकुमारीसारख्या कितीतरी कन्यांना विषाचा प्याला घेऊन समाजाला निर्भय

आणि निश्चित करावें लागलें आहे. मीरेनें विषपान केलें. फुलांच्या करंड्यांतून डसण्यासाठीं साप पाठवला. त्याचेंहि तिनें शाळिग्राम म्हणून स्वागत केलें. पण तिनें उघडपणें चालवलेली भगवद्भक्ति आणि संतसमागम सोडला नाहीं.

आपल्या समाजांत स्त्रीची स्थिति अडचणीची असतेच. त्यांतल्या त्यांत विधवेची स्थिति त्याहूनहि करुणास्पद. मीरा मरणाला भीत नव्हती हें तिनें दोनदां सिद्ध केलें. पण विधवेचा होणारा छळ तिला सहन होईना. सासरच्या राज्यांत पाणीदेखील प्यायचें नाहीं असा निश्चय करून ती बाहेर गेली. तिथून कंटाळून ती भक्तीची राजधानी वृंदावन येथें भक्तमंडळींत जाऊन राहिली. तेथेंहि तिचें स्त्रीत्व आड येऊं पहात होतें. पण तिनें वैष्णवमहाराजांची कानउघाडणी केली.

मीरेची सगळी साधना तिच्या प्रेमभक्तींतच होती. या साधनेला पुस्ती म्हणून तिनें वर सांगितल्याप्रमाणें अनेक साधना आजमावून पाहिल्या. त्या सर्वांचा प्रतिध्वनि तिच्या काव्यांत ऐकायला मिळतो. माहेरीं, सासरीं किंवा पुन्हां माहेरीं असतांना मीरेचीं सगळीं पदें राजस्थानी भाषेंतच रचलीं गेलीं आहेत. पुढें वृंदावनला पोचल्यानंतर तिचे दिवस व्रजभाषेच्या वातावरणांत मुरले. मीरेची साधना एकांतसाधना कधीच नव्हती. मीरेचा हा विशेष आहे. ती संतांना बरोबर घेऊन समूहसाधना करीत असे. तिच्या साधनेचा हा विशेष खूप अभ्यासण्यासारखाच आहे. कुठलीहि साधना उघडपणें लोकसमुदायांत चालवली असतां तिच्यांत एकांताचे दोष शिरूं शकत नाहींत. 'साचको आच नहीं'; ती गोष्ट उघड साधनेंतच साधतां येते. भक्तांच्या चरित्राचें स्मरण करून स्वतःची वाणी पावन करणाऱ्या नाथाजीनें आपल्या 'भक्तमाल' या ग्रंथामधें मीरेच्या भक्तीची उत्कटता आणि प्रकटता यांचा विशेष आदरयुक्त उल्लेख केला आहे.

मीरेची कीर्ति इतकी वाढली कीं तिच्याविरुद्ध चाललेली किंवदंती आपोआप फिकी पडली. माहेरसासरच्या लोकांनीं तिला घरीं परत येण्यासाठीं मानानें बोलावलें असें दिसतें. पण अंड्यांतून बाहेर पडलेला जीव पुन्हां अंड्यांत कसा जाणार? सत्याग्रही मीरेनें पुन्हां राजस्थानांत जाण्याचें नाकारलें.

मीरेचें जीवनचरित्र लिहिणाऱ्यांनीं त्या काळच्या राजकीय परिस्थितीचा थोडासा उल्लेख केला आहे. तिच्या माहेरच्या घराण्याचे काय आणि सासरच्या घराण्याचे काय, त्याकाळीं दिवस चांगले नव्हते. लढाया, मारामाऱ्या, कापाकापी यांचे ते दिवस होते. दिल्लीचा बादशहा मोगल राज्याचा विस्तार करण्यासाठीं कसून झटत होता. तरीहि आपल्या लोकांच्या स्वभावाप्रमाणें राजस्थानमधील हिंदु राजे आपापसांतील वैमनस्य विसरून एकवटूं शकत नव्हते.

राजकुळांत वाढलेल्या मीरेच्या मनावर या सर्व परिस्थितीचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील? ऐहिक गोष्टींची नश्वरता आणि ऐहिक महत्त्वाकांक्षेची क्षुद्रता तिला चांगलीच पटली असली पाहिजे. तिनें ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून आपलें सर्व आयुष्य ईशभक्तीला वाहून घेतलें.

वृंदावन सोडून अन्यत्र जाण्याचा विचार कां केला हें तिच्या भजनांत तिनें कोठेंहि सांगितलें नाहीं. कदाचित् नातेवाईक मंडळींनीं घरीं परत येण्याचा केलेला आग्रह असह्य झाल्यामुळें तिनें वृंदावन सोडून कुठेंतरी दूर रहाण्याचा विचार केला असावा, किंवा अनेक तऱ्हेच्या नव्या नव्या साधुसंतांना आणि भक्तमंडळींना भेटण्याचा आनंद मिळावा म्हणून तीर्थयात्रेंत बरेंचसें आयुष्य खर्च करण्याचें तिला सुचलें असावें.

कसेंहि असो, मीरा शेवटीं द्वारकाधीशाच्या घरीं जाऊन पोहोंचली. मग तिला सलोकता म्हणा किंवा समीपता म्हणा. माझ्या मतें, वृंदावनांत तिला सलोकता मिळाली होती; द्वारकेंत समीपता; आणि म्हणून तेथेंच तिला सायुज्यमुक्ति मिळवणें सोपें गेलें.

मीरेच्या साहित्यामधें यथेच्छ भेसळ आहे. वाटेल त्यानें वाटेल तसें पद रचावें आणि शेवटीं 'मीराके प्रभु गिरिधर नागर' जोडावें. पण तिनें केलेल्या स्वतःच्या पदांतदेखील शब्द बदलण्याचा धंदा लोकांनीं केला आहे. यामुळें मीरेचीं पदें कोणतीं आणि त्यांचा शुद्ध पाठ कोणता होता हें ठरविणें आतां दुरापास्त झालें आहे. राजस्थानी पदांमधें व्रजभाषेचे शब्द लोकांनीं घुसडले आहेत आणि गुजराथी लोकांनीं तर कित्येक पदांचें सर्रास गुजराथीकरण करून टाकलें आहे: तें इतकें कीं पद हिंदी आहे कीं गुजराथी हें सांगणेंच कठीण व्हावें.

संतसाहित्यावरचें हें संकट आपल्या देशांत सार्वभौम आहे. प्रत्यक्ष आद्यशंकराचार्यांच्या नांवानें कितीतरी स्तोत्रें लिहिलीं गेलीं आहेत. या प्रकारांत फसवाफसवीचा उद्देश नसतो; पण आपण जें कांहीं लिहितों तें गुरुमहाराजांच्या प्रसादानेंच आपल्याला लिहितां आलें— म्हणून तें त्यांचेंच आहे, अशी भूमिका असते.

महाराष्ट्रांत एकनाथांनीं आपल्या कवित्वाचें सर्व श्रेय जनार्दनस्वामींना दिलें आहे: पण त्यामुळें अमुक कृति एकनाथाची आहे किंवा नाहीं याविषयीं संशय किंवा घोटाळा उत्पन्न होत नाहीं.

सिंधी भाषेंत 'सामी' म्हणून एक थोर संन्यासी संत होऊन गेला. त्यानें कवितेची एकहि ओळ लिहिली नाहीं. त्याच्या एका शिष्यानें यथेच्छ कविता

लिहिली—पण ती सामीच्या नांवानें. आज ती कविता सामीचे श्लोक म्हणूनच ओळखली जाते. पण त्याहि बाबतींत कसलाच घोटाळा नाहीं. लोकांना कवीचें नांव ठाऊक आहे. आणि त्याच्या कवितेंत प्रक्षेप असा मुळींच नाहीं.

शीख गुरूंनीं जें भक्तिकाव्य लिहिलें तें सगळें आदिगुरु नानकाच्या नांवानेंच लिहिलें. पण तेथें घोटाळा नाहीं. एकंदर गुरु दहा झाले. त्यावरून त्यांनीं नानकाच्या नांवानें रचलेल्या कवितेचे मोहल्ले पाडले आहेत. नानकाची जी कविता पांचव्या मोहल्ल्यांत असेल ती अर्जुनदेवाची, दहाव्या मोहल्ल्यांत असेल ती गुरु गोविंदसिंहाची, असें स्पष्टपणें कळतें.

मीरेच्या बाबतींत अशी कसलीच सोय नाहीं. तिची स्थिति शंकराचार्यां-सारखी झाली आहे. तरीहि भाषेवरून मीरेच्या पदांचे तीन काल ठरवितां येतात. जीं पदें केवळ राजस्थानींत आहेत तो काळ पहिला. ज्या पदांमधें व्रजभाषेंतील शब्द, वाक्यरचना किंवा प्रत्यय आले असतील व जींत गुजराथी शब्द नसतील ती कविता व्रजकालांतील होय. आणि शेवटचा काळ तो द्वारकेचा किंवा गुजराथीचा.

मीरेची साधना प्रकट होती, सामाजिक होती; आणि म्हणून मीरा जेथें गेली तेथील भाषा तिनें आपलीशी केली होती याविषयीं शंका रहात नाहीं. जर अधिकारी लोक या दृष्टीनें संशोधन करतील, तर मीरेच्या पदांचे कालविभाग पाडतां येतील. आणि त्यानंतर तिनें कोणकोणत्या साधना कोणकोणत्या काळांत अजमावून पाहिल्या हेंहि ठरवतां येईल. हें काम जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच नाजुकहि आहे. मीरेच्या साधनेचा आणि साहित्याचा ज्यांना उत्तम परिचय आहे, आणि मीराकालीन संतांचीदेखील ज्यांना चांगली माहिती आहे अशा अधिकारी लोकांनींच सहानुभूतीनें आणि नम्रपणें हें काम केलें पाहिजे. दीर्घकालीन व्यासंगावांचून आणि उत्कट संशोधनावांचून या कामीं सफलता मिळणार नाहीं. पण भारतीय संतांच्या निरनिराळ्या साधनांचा छडा लावण्याच्या दृष्टीनें हें काम अत्यंत महत्त्वाचें आहे. हें जर आपल्याला करतां आलें तर त्यांतून मीरेच्या भक्तिसूत्रांचें दोहन आपल्याला करतां येईल. मीरेची साधना मौलिक होती, उत्कट होती आणि त्याहून विशेष म्हणजे ती निडर होती. एवढ्याचसाठीं मीरेच्या प्रेमसाधनेचें अध्ययन खोल आणि उत्कटपणें झालें पाहिजे.

प्रेमसाधना मधुर साधना खरी, पण ती कांहीं सोपी साधना नव्हे. भक्ताला ईश्वराची ओढ लागते. ईश्वरप्राप्तीच्या तळमळीनें तो तडफडत असतो. विरहवेदना त्याला अखंड जाळीत असते. आशा आणि निराशा यांचे हेलकावे त्याला अखंड सोसावे लागत असतात. धूप जळत असावा आणि त्यांतून सर्वत्र सुगंध पसरत असावा

त्याप्रमाणें भक्ताचें जीवन वेदनामय पण कल्याणकारी असतें. या साधनेला उपमा द्यावयाचीच तर ती स्त्रीपुरुषांमधील उत्कट आकर्षणाचीच देतां येते. मनुष्यमात्राला ज्या आकर्षणाचा निरपवाद अनुभव आहे त्या अनुभवाच्या तुलनेनेंच दैवी आकर्षणाची कल्पना होऊं शकते; आणि म्हणूनच सर्व देशांच्या, सर्व युगांच्या, सर्व धर्मांच्या, सर्व पंथांच्या संतांनीं ईशभक्ति किंवा इष्टभक्ति व्यक्त करण्यासाठीं स्त्रीपुरुषांमधील प्रेमाची परिभाषाच वापरलेली आहे. एवढेंच नव्हे, तर साधनेमधेंदेखील स्त्रीपुरुषांच्या परस्परस्वात्मार्पणाची भावनादेखील त्यांनीं वापरलेली आहे.

साधकांना आणि संतांना असें करण्यांत जे अडथळे आहेत, खड्डे आहेत, संकटें आहेत त्यांची जाणीव होती; आणि म्हणून कित्येकांनीं तो रस्ताच सोडून दिला. कित्येकांनीं आपली साधना गुप्तपणें चालविली. कित्येकांनीं गूढ परिभाषा वापरली. पण भक्त आणि भगवान यांमधील आकर्षण किंवा संबंध व्यक्त करण्यासाठीं शृंगाराची भाषा त्यांना टाळतां आली नाहीं. येशू ख्रिस्तानंतर शेंकडों वर्षांनीं जिचा जन्म झाला ती सेंट थेरेसा जेव्हां येशूच्या प्रेमाच्या गोष्टी करते आणि त्याचा अत्याचार सहन होत नाहीं म्हणून विव्हळते तेव्हां सामान्य वाचकाला तें वर्णन वाचून कसेंसेंच वाटतें. पण भक्त तरी करणार काय?

हल्लीं हल्लीं मानसशास्त्राचा अभ्यास करणारे अनेक पंथ उत्पन्न झाले आहेत. त्यांनीं भक्तिपंथांचें स्वरूप तपासतांना त्यांतील विकृतीचे प्रकारहि सोडले नाहींत. अशा मानसशास्त्रज्ञांमध्ये युरोपांतील फ्रॉइड यानें कामवासनेचें सार्वभौमत्व स्वीकारून मनोविश्लेषणाचा एक नवीन प्रकार सुरू केला. या पंथाच्या लोकांना जिकडेतिकडे लैंगिक आकर्षणच दिसून येतें. या लोकांनीं संतांच्या साधनेचे धिंडवडे चालवले आहेत आणि संतांनीं जी शृंगारिक परिभाषा वापरली आहे तिच्यामुळें तर त्यांचें म्हणणें अगदीं खरें आहे असें सिद्ध करणें मुळींच जड जात नाहीं.

असें सांगतात कीं, इराणी सूफी संतकवि उमरखय्याम यानें जन्मांत दारूच्या थेंबालादेखील स्पर्श केला नव्हता. पण त्यानें आपल्या रुबायांमधें अथपासून इतिपर्यंत भक्तीच्या साधनेला मद्यपानाचें रूपकच दिलें आहे. या सूफी लोकांच्या साधनाकाव्याच्या जोरावर हाला, प्याला आणि मधुबाला यांचा एक पंथच कित्येक ठिकाणीं माजलेला आहे.

आपल्या इकडे तर शाक्तांनीं वीरोचित म्हणून वाममार्गी साधनाच विस्तारली आहे.

इतरांची गोष्ट सोडून द्या. आपल्या भोळ्याभाबड्या, सोवळ्या तुकारामालादेखील गोपींची साधना आठवून विराण्या लिहिण्याची बुद्धि झाली.

मग मीरेसारख्या कोंवळ्या वयाच्या अल्लड बालेला कृष्णभक्तीनें स्पर्श केल्यानंतर तिची स्वतंत्र साधना आणि तिची कवितासृष्टि माधुर्यभक्तीनें थबथबली असल्यास आश्चर्य कोणतें? पोरपणींच तिनें गिरिधर गोपाळाशीं मनानें लग्न लावून घेतलें. वयांत येते न येते तोंच तिचें लग्न लावून देण्यांत आलें. अशा स्थितींत तिनें गृहस्थाश्रम चालवला किंवा नाहीं आणि चालवला असल्यास नवऱ्यानें तिला कसें वागवलें याचा कांहींच पुरावा आपल्याजवळ नाहीं. पण तिच्या वांट्याला प्रथम वैधव्य आणि नंतर सामाजिक छळ हींच आलीं.

पण मीरेला परिस्थितीशीं झुंजत असतांना मनानें अलिप्त रहाण्याची असाधारण सिद्धि प्राप्त झाली होती. तिच्या शृंगारिक काव्यांत आणि विरहकाव्यांत-देखील विकृत भावना कुठेंच दिसत नाहीं. तिचें अद्भुत पद 'जोगी मत जा' हें घेतलें तरी तिच्या साधनेची उज्ज्वलताच तेजःपुंजपणें प्रकट होते. कांहीं लोक म्हणतात कीं हें पद मीरेचें तर नव्हेच, पण फारसें प्राचीनहि नाहीं. तें कसेंहि असो, या पदांतील उत्कटता लोकोत्तर आहे यांत शंका नाहीं.

मीरेच्या पदांमधें भक्तिरस ओथंबलेला आहे. तिच्या काव्यांत संस्कारिता आहे—पण नटवेपणा नाहीं. काव्यरस भरपूर असला तरी ही कविता प्रयत्नपूर्वक घडवलेली आहे असें वाटण्याइतकी कृत्रिमता तिच्यांत नाहीं. प्रेमभक्तीचे बारकावे घेण्यांत सूरदासाइतकी ती खोलांत शिरली नसली तरी भक्तीचा उन्माद आणि स्त्रीसहज स्वात्मार्पण तिच्या काव्यांत सहजपणें व्यक्त होतें. म्हणूनच भक्तिमार्गी साधकांना मीरेच्या काव्याचें इतकें आकर्षण आहे.

प्रेमभक्तीमधें जे अनेकानेक भाव हेलावत असतात ते सर्व व्यक्त करण्याची शक्ति जशी काव्यांत असते तशी संगीतांतहि असते. मीरेला या दोन्ही प्रकारचें वरदान मिळालेलें होतें. यामुळेंच मीरेचीं पदें इतकीं लोकप्रिय झालीं आहेत आणि तीं भारतांत जिकडेतिकडे पसरलीं आहेत. भावनांचा खरेपणा आणि त्यांचें पावित्र्य या दोन्ही गोष्टी मीरेच्या पदांमधें पावलोपावलीं प्रकट होतात.

आत्मनिष्ठ अबला किती जबरदस्त तेजस्विनी होऊं शकते आणि एवढें आत्मिक शौर्य दाखवूनदेखील स्त्री ही स्त्रीच कशी राहूं शकते याचें उत्तम उदाहरण मीरेच्या जीवनांत आणि कवनांत आपल्याला मिळतें. आणि म्हणूनच मीरेने भारतीय जनमानसाची इतकी पकड घेतली आहे. केवळ भावनात्मक आंतरिक सोलीव आत्मकथा वाचावयाची असेल तर मीरेची कविताच वाचावी.

भारतीय नारीजातीच्या हृदयाला व्यक्त करणारी ही कविता आजवर मराठी भाषेंत आली नाहीं हेंच एक मोठें आश्चर्य. मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणा-

बाई, यांच्यासारख्या स्त्रीसंतांनीं ज्या मराठी भाषेला शोभविलें आहे त्या मराठी कवितासृष्टींत मीरेचें दर्शन घडूं नये हें एक मोठें दुःखद आश्चर्यच म्हटलें पाहिजे. शेंकडों वर्षांची ही उणीव दूर करण्याचें मंगेश पाडगांवकरांना सुचलें याबद्दल त्यांचें तर अभिनंदन केलेंच पाहिजे, पण मराठींतून मीरेचें दर्शन आज आपल्याला घडत आहे याबद्दल आजच्या चवचाल काळाचें पण अभिनंदन केलें पाहिजे. कदाचित् असेंहि असेल कीं ज्या काळांत शृंगाररसाची गोडी वाढत आहे त्याच काळांत मधुराभक्तीची प्रेमसाधना कशी असूं शकते याचेंहि दर्शन करवण्याची इच्छा जनगणमनाच्या अधिनायकाला झाली असेल. देवाच्या मंदिरांत प्रवेश करण्याचे दरवाजे पुष्कळ असतात. मग आजच्या काळीं प्रेमभक्तीचा दरवाजा झांकलेला कां रहावा? मीरेच्या निमित्तानें हा दरवाजा उघडला जात आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. एका काळीं महाराष्ट्राच्या पुरंदर विठ्ठलानें कर्नाटकी साहित्याची सेवा आणि तेथें उत्तम स्थान मिळवलें. रामभक्तीची रामायणी कथा भारतांतील सगळ्याच प्रदेशांनीं आणि प्रादेशिक भाषांनीं आपलीशी केली. कृष्णभक्तीचें लोण भागवतसंप्रदायामुळें सर्वत्र पसरलें. त्याचप्रमाणें आज हिंदी साहित्यांतील संपदा—आध्यात्मिक संपदा—भारतभर पसरली पाहिजे. याचा प्रारंभ तुळशीदास, सूरदास, कबीर आणि मीरा यांच्या साहित्यकृतीपासूनच झाला पाहिजे. मंगेश पाडगांवकरांनीं हा शुभारंभ केला आहे. हा उत्तम मुहूर्त आहे असें मी समजतों.

—काका कालेलकर

# मीरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 98122
ग्रंथ : ठाणे (स्थळ प्रत)

## १

मैं गिरिधर के घर जाऊं
गिरिधर म्हांरो सांचो प्रीतम देखत रूप लुभाऊं
रैण पडे तब ही उठि जाऊं भोर भये उठि आऊं
रैणदिना वाके संग खेलूं ज्यूं त्यूं वाहि रिझाऊं
जो पहिरावै सोई पहिरूं जो दे सोई खाऊं
मेरी उणकी प्रीत पुराणी उण बिनि पल न रहाऊं
जहां बिठावें तितही बैठूं बेंचै तो बिक जाऊं
मीरा के प्रभु गिरिधर नागर बार बार बलि जाऊं

## २

पग घुंघरु बांधि मीरा नाची रे
लोग कहैं मीरा हो गइ बावरि सास कहे कुलनासी रे
जहर का प्याला राणाजी भेजा पीवत मीरा हांसी रे
मैं तो अपने नारायण की हो गइ आपहि दासी रे
मीरा के प्रभु गिरिधर नागर सहज मिला अविनाशी रे

## १

मी हरिच्या घरिं जाइन रे
गिरिधर माझा प्रियकर त्याचें रूप पाहतां मोहिन रे
हळूच रात्रीं उठून जाइन : परत पहाटे येइन रे
मी रात्रंदिन करून क्रीडा माझ्या हरिला रिझविन रे
हरि देइल तीं माझीं वसनें, हरि देइल तें सेविन रे
माझी त्याची प्रीत सनातन, जगेन नच क्षण हरिविण रे
बसेन मी हरि म्हणेल तेथें, विकितां विकिली जाइन रे
जन्मजन्म मीरेचे हरिवरि मी ओवाळुन टाकिन रे
मी हरिच्या घरिं जाइन रे

## २

पदिं घुंगुर मीरा नाचे रे
म्हणति लोक, हो पागल मीरा; सासु म्हणे कुलनाशी रे
विषप्याला दे धाडुनि राणा : हांसत मीरा प्राशी रे
मी तर झालें अपुली आपण माझ्या हरिची दासी रे
मीरेचा प्रभु गिरिधर नागर सहज मिळे अविनाशी रे
पदिं घुंगुर मीरा नाचे रे

## ३

मैं जाण्यो नाहीं प्रभु को मीलण कैसे होय री
आये मेरे सजना फिरी गये अंगना मै अभागण रही सोय री
फारुंगी चीर करूं गलकंथा रहुंगी बैरागण होय री
चुडियां फोरूं मांग बखेरूं कजरा मैं डारूं धोय री
निसिवासर मोहिं विरह सतावै कल न परत पल मोयरी
मीरा के प्रभु हरि अविनासी मिलि बिछुडो मति कोय री

## ४

भज मन चरणकमल अविनासी
जे ताइ दीसे धरण-गगन बिच तेताइ सब उठ जासी
कहा भयो तीरथ ब्रत कीन्हे कहा लिये करवत कासी
इण देही का गरब न करणा माटी में मिल जासी
यो संसार चहर की बाजी सांझ पड्या उठ जासी
कहा भयो है भगवा पहर्यां घर तज भये संन्यासी
जोगी होय जुगती नहिं जाणी उलटि जनम फिर आसी
अरज करी अबला कर जोरे स्याम तुम्हारी दासी
मीरा के प्रभु गिरिधर नागर काटो जम की फांसी
भज मन चरणकमल अविनासी

## ३

मी नच जाणें प्रभुशीं माझें होइल कैसें मीलन ग
अंगणिं येउन परते साजण : मी निद्रेंत अभागिण ग
वसनें फाडुन करीन झोळी, बनेन मी बैरागिण ग
करिन जटा मी, चुडाहि फोडिन, धुवून काजळ टाकिन ग
रात्रंदिन मज विरह छळितसे, पळभरही मज चैन न ग
मीरेचा हरि, मीलन घडतां जाउं नये मग टाकुन ग
मी नच जाणें प्रभुशीं माझें होइल कैसें मीलन ग

## ४

भज मन चरणकमल अविनाशी
गगनधरा यांमधें दिसे जें तें तें सर्व विनाशी
सांग कशा व्रततीर्थाटन ? कां जीव धावया काशी ?
या देहाचा गर्व वृथा रे : अखेर माती होशी
खगक्रीडेपरि दिन ढळतां संसार जाय विलयासी
भगवें घालुन कशास होसी घर सोडुनि संन्यासी
योगि म्हणविसी युक्ति न कळतां; भवचक्रांतच फसशी
करि विनती कर जोडुनि अबला कृष्णा ! ही तव दासी
गिरिधर प्रभु, मीरेस गुंतवूं नको यमाच्या पाशीं
भज मन चरणकमल अविनाशी

▦ ५

मेरे तो गिरधर गोपाल दूसरो न कोई
जाके सिर मोरमुकुट मेरो पति सोई
छांडि दई कुल की कानि कहा करिहै कोई
संतन ढिग बैठि बैठि लोकलाज खोई
अंसुवन जल सींचि सींचि प्रेमबेलि बोई
अब तो बेल फैल गई आणंद फल होई
भगति देखि राजि हुई जगति देखि रोई
दासी मीरा लाल गिरिधर तारो अब मोही
मेरे तो गिरधर गोपाल दूसरो न कोई

▦ ६

घडी एक नहिं आवडे तुम दरसण बिन मोय
तुम हो मेरे प्राण जी कासूं जीवण होय
धान न भावै नींद न आवै बिरह सतावे मोय
घायलसी घूमत फिरूं रे मेरो दरद न जाणै कोय
दिवस तो खाय गमाइयो रे रैण गमाई सोय
प्राण गमायो झूरतां रे नैण गमाया रोय
जो मैं ऐसी जाणती रे प्रीत कियां दुख होय
नगर ढंढोरा फेरती रे प्रीत करो मत कोय
पंथ निहारो डगर बुहारूँ ऊभी मारग जोय
मीरा के प्रभु कब रे मिलोगे तुम मिलियां सुख होय

## ५

गिरिधर गोपाळ एक : कुणि न दुजें माझें
तोच पती : मोरमुकुट ज्या शिरीं विराजे
काय करिल कोण मला ? कुलरीती कुठली ?
संतांच्या संगतींत लोकलाज सुटली !
आंसूं शिंपून उभी प्रेमवेल केली
आनंदच फळ होई, वेल लवुन गेली
भक्त बघुनि हसलें मी, रडलें जग दिसतां
मीरा हरिची दासी : तार मला आतां

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ८०३८९४ वि: काव्य
५/३/५९

## ६

घडिभरही मज चैन पडेना तुला पाहिल्याविना हरी
तूंच प्राण रे : तूं नसतांना कशी जगूं मी सांग तरी
अन्न रुचेना, नीज शिवेना, अनुदिन हृदयीं विरह जळे
घायाळापरि फिरतें वणवण; कुणा न माझी व्यथा कळे
वृथाच रात्री निजेंत गेल्या, अन्नसेवनीं दिस सरले
झुरुनि झुरुनि हा प्राण विकल हो, रडुनि रडुनि डोळे सुजले
वेदनाच प्रीतीच्या भाळीं लिहिलेली जर मज कळतें
'प्रीत करुं नका कोणी' सांगत घरोघरीं फिरलें असतें
मार्ग तुझा मी झाडिन देवा, करित प्रतीक्षा राहिन रे
मीरेच्या प्रभु कधीं भेटशिल : तूं मिळतां सुखि होइन रे

■ ७

प्यारे दरसण दीज्यो आय तुमबिन रह्यो न जाय
जलबिन कंवल चंदबिन रजनी
ऐसे तुम देख्यां बिन सजनी
याकुल व्याकुल फिरूं रैणदिन बिरह कलेजो खाय
दिवस न भूख नींद नहिं रैणा
मुखसूं कथत न आवै बैणा
कहा कहूं कुछ कहत न आवै मिल कर तपत बुझाय
क्यूं तरसावो अंतरजामी
आय मिलो किरपा कर स्वामी
मीरा दासी जनम जनम की परी तुम्हारे पाय

■ ८

राम मिलण के काज सखी मेरे आरति उर में जागी री
तलफत तलफत कल न परत है बिरहबाण उरि लागी री
निसदिन पंथ निहारूं पीव को पलकन पल भरि लागी री
पीव पीव मै रटूं रातदिन दूजि सुधि बुधि भागी री
बिरह भवंग मेरो डस्यो है कलेजो लहरि हलाहल जागी री
मेरी आरति मेटि गुसाईं आइ मिलौ मोहि सागी री
मीरा व्याकुल अति उकलाणी पिया की उमंग अति लागी री
राम मिलण के काज सखी मेरे आरति उर में जागी री

## ७

दे दर्शन जिवलगा तुझ्याविण सांग जगूं कशि काय
कमळ जळाविण, रात्र शशीविण
तशीच रे ही सखि तुजवाचुन
व्याकुळ व्याकुळ फिरे रातदिन : विरह चित्त हें खाय
भूक न दिवसा, रात्रीं नीज न
शमव आग देउन आलिंगन
शब्द फुटेना मुळीं मुखांतुन : मी अबोल...निरुपाय
कां छळिसी रे अंतर्यामी
करुनि कृपा घे जवळी स्वामी
जन्म जन्म मीरा तव दासी तुझे पूजिते पाय

## ८

राममीलनासाठीं सखये उरीं वेदना जागे ग
तळमळतें मी : चैन न पळभर; विरहबाण उरें लागे ग
वाट प्रियाची बघें रातदिन; नयनां नीज शिवेना ग
नामजपांतच शुद्ध हरपली : दुसरें कांहिं सुचेना ग
विरहभुजंग डसे हृदयाला : सर्वांगाची लाही ग
व्यथा शमव हृदयाशीं घेउन हरि मजला लवलाही ग
मीरा व्याकुळ प्रेमव्यथेनें : ओढ प्रियाची लागे ग
राममीलनासाठीं सखये उरीं वेदना जागे ग

## ९

बसो मोरे नैनन में नंदलाल
मोहनी मूरती सांवरी सूरती नैना बने बिसाल
मोरमुकुट मकराकृत कुंडल अरुण तिलक दिये भाल
अधर सुधारस मुरली राजति उर बैजंती माल
छुद्र घंटिका कटितट सोभित नूपुर सबद रसाल
मीराप्रभु संतन सुखदाई भक्तबछल गोपाल
बसो मोरे नैनन में नंदलाल

## १०

देखो सहियां हरि मन काठो कियो
आवन कह गयो अजूं न आयो करि करि वचन गयो
खान पान सुध बुध सब बिसरी कैसे करि मैं जियो
बचन तुम्हारे तुमही बिसारे मन मेरो हर लियो
मीरा कहे प्रभु गिरधर नागर तुम बिनि फटत हयो
देखो सहियां हरि मन काठो कियो

■ ९

रहा रे मम नयनीं नंदलाल
मोहक मूर्ती, शामल कांती, सुंदर नयन विशाल
मोरमुकुट, मकराकृति कुंडल, भाळीं तिलकहि लाल
सुधामधुर मुरली अधरीं, उरिं वैजयंतिमणिमाळ
कटीस घुंगुर, चरणीं नूपुर, रुमझुम नाद रसाळ
भक्तां वत्सल, सुख संतांचें मीरेचा गोपाळ
रहा रे मम नयनीं नंदलाल

■ १०

सखे मन कठोर हरिनें केलें
वचन दिलें : पण अजून हरिचें इथें न पाउल वळलें
कशी जगूं मी : अन्न रुचेना, देहभानही गळलें
तुझें वचन हरि तूंच विसरशी; तूं मन माझें हरिलें
गिरिधर प्रभु तुजविण मीरेचें हृदय दुभंगुन गेलें
सखे मन कठोर हरिनें केलें

## ११

जोगियारी प्रीतडी है दुखडा री मूल
हिलमिल बात बणावत मीठी पीछे जावत भूल
तोडत जेज करत नहिं सजनी जैसे चंपेली के फूल
मीरा कहै प्रभु तुमरे दरस बिन लगत हिवडा मे सूल

## १२

परम सनेही राम की निति ओळूं री आवै
राम हमारे हम हैं राम के हरिबिन कछु न सुहावै
आवण कह गये अजहुं न आये जिवडो अति उकलावै
तुम दरसण की आस रमैया कब हरि दरस दिखावै
चरणकंवल की लगनि लगी नित बिन दरसण दुख पावै
मीरा कूं प्रभु दरसण दीज्यौ आणंद बरण्यूं न जावै
परम सनेही राम की निति ओळूं री आवै

## ११

या जोग्याची प्रीत व्यथेचें मूळ
जाय विसरुनी प्रथम पाडुनी गोड बोलुनी भूल
खुडून घेतो निमिषांतच सखि, चमेलिचें जणु फूल
तुझ्या दर्शनाविण हरि लागे मीरेच्या उरीं शूळ
या जोग्याची प्रीत व्यथेचें मूळ

## १२

परमसखा तो राम तयाची नित्य आठवण होई
मी रामाची, रामहि माझा, सुचे न त्याविण कांहीं
व्याकुळ झालें : येइन म्हणुनी अजुनि न तो सखि येई
कधिं येइल हरि ? मी आशेनें वाट तयाची पाही
पदकमलांची ओढ लागली : त्यांविण सुख मज नाहीं
मीरेला दे दर्शन, नच आनंद वर्णिला जाई
परमसखा तो राम तयाची नित्य आठवण होई

## १५

ऐसी लगन लगाइ कहां तूं जासी
तुम देखे बिन कल न परति है तलफि तलफि जिव जासी
तेरे खातर जोगण हूंगी करवत लूंगी कासी
मीरा के प्रभु गिरिधर नागर चरण कंवल की दासी

## १६

तुम्हरे कारण सब सुख छांड्या
अब मोहिं क्यूं तरसावौ
बिरहबिया लागी उर अंतर
सो तुम आय बुझावौ

अब छोड्यां नहिं बनै प्रभूजी
हंसकर तुरत बुलावौ
मीरा दासी जनम जनम की
अंग सूं अंग लगावौ

## १५

मन जडवुन ऐसें सांग कुठें तूं जासी
तळमळतें मी, चैन न तुजविण : येति प्राण कंठाशीं
तुझिया खातर बनेन जोगिण, लाविन फांस गळ्याशीं
मीरेचा प्रभु गिरिधर नागर पद्कमलांची दासी

## १६

तुजसाठीं सुख त्यजिलें सारें
अंत किती बघसी मग रे
विरहव्यथेनें जळतें अंतर
तूंच शमव ही तगमग रे

क्षणहि दुरावा नको; बोलवीं—
हंसुनि त्वरित तुजपाशीं रे
जन्म जन्म मीरा तव दासी
भिडव अंग अंगाशीं रे

## १३

हेरी मै तो दरद दिवाणी होई दरद न जाणै मेरो कोइ
घायल की गति घायल जाणै की जिण लाई होइ
जौहरि की गति जौहरि जाणै की जिण जौहरि होइ
सूली उपरि सेझ हमारी सोवण किसविध होइ
गगनमंडल पै सेझ पिया की किसविध मीलण होइ
दरद की मारी बन बन डोलूं बैद मिल्या नहीं कोइ
मीरा की प्रभु पीर मिटैगी जब बैद सांवलिया होइ
हेरी मै तो दरद दिवाणी होइ दरद न जाणै मेरो कोइ

## १४

पतियां मैं कैसे लिखूं लिखिही न जाइ
कलम धरत मेरो कंपत हिरदो रहो घर्राई
बात कहूं मोहि बात न आवै नैन रहै झर्राई
किसविध चरणकमल मैं गहिहौं सबहि अंग थर्राई
मीरा कहै प्रभु गिरिधर नागर सबही दुख बिसराई

## १३

सखि मी दर्ददिवाणी : माझी व्यथा कुणा न कळे ग
घायाळाची मर्मवेदना घायाळास कळे ग
रत्नपारख्याविण रत्नांची कुणा न पारख ठावी
शूलावर मम शेज सखे जर, नीज कशी मज यावी ?
गगनमंडलीं शेज प्रियाची : मीलन मग कोठें ग ?
फिरलें वनवन जखमी होउन, वैद्य कुणि न भेटे ग
मीरेची संपेल व्यथा जर हरीच वैद्य मिळे ग
सखि मी दर्ददिवाणी : माझी व्यथा कुणा न कळे ग

## १४

पत्र लिहूं मी सांग कसें गऽ मुळीं न लिहिलें जाई
थरथर कांपे करीं लेखणी, धडधड हृदयीं होई
अश्रुधार ही अविरत लागे, फुटे न शब्द जराही
चरणकमल मी पूजूं कैसी : कंपन अवघ्या देहीं
गिरधर प्रभु रे, सर्व दुःख हें विसरे बघ मीरा ही
पत्र लिहूं मी सांग कसें गऽ मुळीं न लिहिलें जाई

## १५

ऐसी लगन लगाइ कहां तूं जासी
तुम देखे बिन कल न परति है तलफि तलफि जिव जासी
तेरे खातर जोगण हूंगी करवत लूंगी कासी
मीरा के प्रभु गिरिधर नागर चरण कंवल की दासी

## १६

तुम्हरे कारण सब सुख छांड्या
अब मोहिं क्यूं तरसावौ
बिरहबिया लागी उर अंतर
सो तुम आय बुझावौ

अब छोड्यां नहिं बनै प्रभूजी
हंसकर तुरत बुलावौ
मीरा दासी जनम जनम की
अंग सूं अंग लगावौ

## १५

मन जडवुन ऐसें सांग कुठें तूं जासी
तळमळतें मी, चैन न तुजविण : येति प्राण कंठाशीं
तुझिया खातर बनेन जोगिण, लाविन फांस गळ्याशीं
मीरेचा प्रभु गिरिधर नागर पद्कमलांची दासी

## १६

तुजसाठीं सुख त्यजिलें सारें
अंत किती बघसी मग रे
विरहव्यथेनें जळतें अंतर
तूंच शमव ही तगमग रे

क्षणहि दुरावा नको; बोलवीं—
हंसुनि त्वरित तुजपाशीं रे
जन्म जन्म मीरा तव दासी
भिडव अंग अंगाशीं रे

## १७

गावे राग कल्याण मोहन गावे राग कल्याण
आप गावे ने आप बजावे मोरली थुं मिलावे तान
मोर पींछ शिर मुकुट बिराजे कुंडल झलके कान
मीरा के प्रभु गिरिधर नागर गोपी तजिया ध्यान
गावे राग कल्याण मोहन गावे राग कल्याण

## १८

भजन भरोसे अविनाशी मैं तो भजन भरोसे अविनाशी
जप तप तीर्थ कछुए ना जाणूं करत में उदासी रे
मंत्र ने जंत्र कछुए ना जाणूं वेद पढयो न गइ काशी
मीरा के प्रभु गिरिधर नागर चरणकमल की हुं दासी
भजन भरोसे अविनाशी मैं तो भजन भरोसे अविनाशी

■ १७

गाइ राग कल्याण, मोहन गाइ राग कल्याण
गात गात वाजवी, मुरलिच्या सुरांत मिसळी तान
मोरपिसांचा मुकुट शिरावर, शोभवि कुंडल कान
मीरेचा प्रभु गिरिधर नागर : गोपी त्यजिती ध्यान
गाइ राग कल्याण, मोहन गाइ राग कल्याण

■ १८

भजन करित अविनाशी झालें, भजन करित अविनाशी
जपतप नाहीं केलें, कधिं नच गेलें मी तीर्थासी
मंत्रतंत्र नच, वेद न पढिले, मीं न पाहिली काशी
मीरेचा प्रभु गिरिधर नागर : पद्‌कमलांची दासी
भजन करित अविनाशी झालें, भजन करित अविनाशी

## १९

म्हारा ओगलिया घर आया जी
तन की ताप मिटी सुख पाया हिलमिल मंगल गाया जी
घन की धुनि सुनि मोर मगन भया यूं मेरे आणंद छाया जी
मगन भई मिलि प्रभु अपणा सूं भौ का दरद मिटाया जी
चंद कूं देखि कमोदणि फूलै हरखि भया मेरी काया जी
रग रग सीतल भई मेरी सजनी हरि मेरे महल सिधाया जी
सब भगतन का कारज कीन्हा सोई प्रभु मैं पाया जी
मीरा बिरहिणि सीतल होई दुख दुंद दूरि न्हसाया जी
म्हारा ओगलिया घर आया जी

## २०

तुमबिन मोरी कौन खबर ले गोवरधन गिरिधारी रे
मोर मुकुट पीतांबर शोभे कुंडल की छबि न्यारी रे
भरी सभा मो द्रौपदी ठारी राखो लाज हमारी रे
मीरा के प्रभु गिरिधर नागर चरनकमल बलिहारी रे

## १९

परदेशी सजण घरीं आले
देहताप सरले : सुखमय मी मंगल गीत म्हणालें
मोर जसा घनगर्जन श्रवुनी तैसी उन्मन झालें
प्रभुमीलन होतांच क्षणीं त्या सारें दुःख गळालें
चंद्र बघुनि जशि फुले कुमुदिनी तैसी फुलुनी गेलें
नसानसांत भरे शीतलता : महालांत हरि आले
सगळ्या भक्तांचे कैवारी ते प्रभुचरण मिळाले
मीरा विरहिणि शीतल झाली : द्वंद्वच पार निमालें
परदेशी सजण घरीं आले

## २०

तुजविण मज आधार कुणाचा गोवर्धन गिरिधारी रे
मोरमुकुट पीतांबर शोभे, कानिं कुंडलें न्यारीं रे
भर सभेंत द्रौपदी उभी ही : राखी लाज मुरारी रे
मीरेचा प्रभु गिरिधर नागर चरणकमल बलिहारी रे

## २१

यदुवर लागत है मोहिं प्यारो
मथुरा में हरि जन्म लियो है गोकुल में पग धारो
जन्मत ही पुतना गति दीनी अधम उधारन हारी
यमुना के नीरे तीरे धेनु चरावै ओढे कामरि कारो
सुंदर बदन कमलदललोचन पीतांबर पट वारो
मोर मुकुट मकराकृत कुंडल करमें मुरली धारो
शंख चक्र गदा पद्म बिराजै संतन को रखवारो
जल डूबत ब्रज राखि लियो है करपर गिरिवर धारो
मीरा के प्रभु गिरिधर नागर जीवनप्राण हमारो

## २२

माई म्हांने सुपने में बरी गोपाल
रातीपीती चुनडी ओढी मेंहदी हाथ रसाल
कांई और को बरूं भांवरी म्हां के जग जंजाल
मीरा के प्रभु गिरिधर नागर करी सगाई हाल
माई म्हांने सुपने में बरी गोपाल

## ▦ २१

यदुवर जिवलग हा गिरिधारी
मथुरेमधिं जन्मला, वाढला गोकुळांत कंसारी
जन्मतांच दे पूतनेस गति, पतितांना उद्धारी
यमुनातीरीं कांबळ काळी घेउनि धेनू चारी
सुंदर वदन, कमलदललोचन हा पीतांबरधारी
मोरमुकुट, मकराकृति कुंडल, करिं मुरली मनहारी
शंखचक्र धरि गदापद्म हरि संतांचा कैवारी
करिं गोवर्धन उचलुन घेउन बुडतें गोकुळ तारी
मीरेचा प्रभु गिरिधर नागर जीवनप्राण मुरारी

## ▦ २२

स्वप्नांत मला हरिनें वरिलें
पदर ओढिला, लाल मेंदिचे करांत कर धरिले
जगजंजाळीं कुणा वरूं मी ? हरिनें मन हरिलें
छळ मांडी जग, परि मीरेनें हरिला अनुसरिलें
स्वप्नांत मला हरिनें वरिलें

## २३

हरि मेरे जीवन प्रान-अधार
और आसरो नाहीं तुमबिन तीनू लोक मंझार
आप बिना मोहिं कछु न सुहावै निरख्यो सब संसार
मीरा कहै मैं दासि रावरी दीज्यौ मती बिसार
हरि मेरे जीवन प्रान-अधार

## २४

मोहि लागी लगन हरिचरनन की
चरन बिना कछुवै नहिं भावै जग माया सब सपननकी
भवसागर सब सूखि गयो है फिकर नहीं मोहि तरनन की
मीरा के प्रभु गिरिधर नागर आस वही गुरु सरनन की
मोहि लागी लगन हरिचरनन की

## २३

हरि या प्राणांचा आधार
नाहिं आसरा तुजविण दुसरा तीन्ही लोक असार
तुजवाचुन मज सुचे न कांहीं नीरस हा संसार
मीरा हरिचरणांची दासी : तूंच मला प्रभु तार
हरि या प्राणांचा आधार

## २४

मज आस एक हरिचरणांची
हरिचरणांविण सुचे न कांहीं, जग हें माया स्वप्नांची
भवसागर हा जाय सुकुनिया : फिकिर मला नच तरण्याची
मीरेचा प्रभु गिरिधर नागर : ओढ शरण तुज जाण्याची
मज आस एक हरिचरणांची

२५

छांडो लंगर मोरी बाहियां गहौ ना
मैं तो नार पराये घर की मेरे भरोसे गुपाल रहौ ना
जो तुम मेरी बहियां धरत हो नयन जोर मेरे प्राण हरौ ना
बृंदाबन की कुंजगली में रीति छोड अनरीति करौ ना
मीरा के प्रभु गिरिधर नागर चरणकमल चित टारे टरौ ना

२६

जावा दे गुमानी कृष्ण म्हांरे घर काम छे
थें हो लंगर नंद महर के व्रजबरसाने म्हांरो गाम छे
जानो नहीं तो पूंछ लीजो श्रीराधा म्हारो नाम छे
मीरा के प्रभु गिरिधर नागर नाम थांको बदनाम छे

## २५

सोड लबाडा माझा हात धरूं नको
मी तर नारी परक्या घरची : माझा भरवसा मुळीं करूं नको
हात जरी धरिलास तरी रे नयन जडवुनी प्राण हरूं नको
वृंदावनिंच्या कुंजवनीं तूं रीत सोडुन अनरीत वरूं नको
मीरेचा प्रभु गिरिधर, हृदयीं चरणकमल तव, दूर सरूं नको

## २६

सोड निमुट तूं वाट खट्याळा, आहे घरिं मज काम रे
मी वरसाना गांवातिल, जरि तूं नंदाचा श्याम रे
नाहीं माहित ? विचारुनी घे : राधा माझें नाम रे
मीरेचा प्रभु गिरिधर नागर, नांव तुझें बदनाम रे

## २७

तुम सुनो दयाल म्हांरी अरजी
भौसागर में बही जात हूं काढो तो थांरी मरजी
यो संसार सगो नहीं कोई सांचा रघुवर जी
मातपिता और कुटुम्बकबीला सब मतलब के गरजी
मीरा के प्रभु अरजी सुन लो चरण लगाओ थांरी मरजी

## २८

बता दे सखी सांवरियां को डेरो कित दूर
इत मथुरा उत गोकुल नगरी बीच बहे यमुना पूर
मथुरा जी की मस्त गुवालिनी मुख पर बरसे नूर
मीरा के प्रभु गिरिधर नागर सांवरे से मिलना जरूर

## २७

दयाळा, ऐका माझी अर्जी हो
भवसागरिं बुडतसें : हवें तर तारा, तुमची मर्जी हो
या संसारीं कुणी न अपुलें तुमच्याविण रघुवरजी हो
मायबाप, गणगोतहि सारे स्वार्थ साधतां राजी हो
विनवी मीरा : बुडवा, तारा—जशि तुमची हरि मर्जी हो

## २८

सांग सखि, हरिचें घर किति दूर
इकडे मथुरा, पल्याड गोकुळ, मधिं यमुनेला पूर
ही मथुरेची उन्मद गौळण : उठे झळकुनी नूर
गिरिधर प्रभुशीं या मीरेची भेट घडेल जरूर

२९

कृष्ण करो जजमान प्रभु तुम कृष्ण करो जजमान
जाकी कीरति बेद बखानत साखी देत पुरान
मोर मुकुट पीतांबर शोभत कुंडल झलकत कान
मीरा के प्रभु गिरिधर नागर दे दर्शन का दान

३०

प्रभुजी मन माने तब तार
नदिया गहरी नाव पुरानी अब कैसे उतरूं पार
वेद पुराना सब कुछ देखे अन्त न लागे पार
मीरा के प्रभु गिरिधर नागर नाम निरंतर सार

## २९

करि तूं कृष्णाला यजमान
ज्याची कीर्ती वेदहि गाती, देई साक्ष पुराण
मोरमुकुटपीतांबर शोभे, कुंडल झळके छान
मीरेचा प्रभु गिरिधर नागर दे मज दर्शनदान

## ३०

प्रभुजी, तुला हवें तर तार
खोल नदी ही, नाव पुराणी : तरुनि कशी जाणार ?
वेद, पुराणें सर्व पाहिलें : लागे अंत न पार
मीरेचा प्रभु गिरिधर नागर, नाम निरंतर सार

## २९

कृष्ण करो जजमान प्रभु तुम कृष्ण करो जजमान
जाकी कीरति बेद बखानत साखी देत पुरान
मोर मुकुट पीतांबर शोभत कुंडल झलकत कान
मीरा के प्रभु गिरिधर नागर दे दर्शन का दान

## ३०

प्रभुजी मन माने तब तार
नदिया गहरी नाव पुरानी अब कैसे उतरूं पार
वेद पुराना सब कुछ देखे अन्त न लागे पार
मीरा के प्रभु गिरिधर नागर नाम निरंतर सार

### २९

करि तूं कृष्णाला यजमान
ज्याची कीर्ती वेदहि गाती, देई साक्ष पुराण
मोरमुकुटपीतांबर शोभे, कुंडल झळके छान
मीरेचा प्रभु गिरिधर नागर दे मज दर्शनदान

### ३०

प्रभुजी, तुला हवें तर तार
खोल नदी ही, नाव पुराणी : तरुनि कशी जाणार ?
वेद, पुराणें सर्व पाहिलें : लागे अंत न पार
मीरेचा प्रभु गिरिधर नागर, नाम निरंतर सार

## ३१

पिय बिन सूनौ छै जी म्हांरो देस
ऐसो है कोइ पिव कूं मिलावै तनमन करूं सब पेस
तेरे कारण बन बन डोलूं कर जोगण को भेस
अवधि बदी ती अजूं न आए पंडर हो गया केस
मीरा के प्रभु कब रे मिलोगे तज दियो नगर नरेस
पिय बिन सूनौ छै जी म्हांरो देस

## ३२

छोड मत जाज्यो जी महाराज
मैं अबला बल नाहिं गुसाईं तुम ही मेरे सिरताज
मै गुणहीन गुण नाहिं गुसांई तुम समरथ महाराज
थांरी होइ के किणरे जाऊं तुम ही हिवडा री साज
मीरां के प्रभु और न कोई राखो अब के लाज

३१

प्रियाविण शून्य गमे मज देश
तनमन त्याला वाहिन जो मज भेटवील हृदयेश
तुझ्या कारणें फिरेन घेउनि मी जोगिणिचा वेश
ओसरली घडि, अजुनि न येई...पिकले सगळे केश
मीरेच्या प्रभु कधीं भेटशिल ? त्यजिलें नगर, नरेश
प्रियाविण शून्य गमे मज देश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

३२

टाकुनी जाउं नका महाराज
मी अबला, बल नाहीं, स्वामी तुम्हि माझे शिरताज
मी गुणहीन, नसे गुण एकहि, तुम्हि समर्थ प्रभुराज
तुमची होतां जाउं कुठें मी ? तुम्हि हृदयाचे साज
मीरेचा प्रभु अन्य न कोणी : तुम्हीच राखा लाज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 28522

## ३३

जोगियासे प्रीत किया दुख होइ
प्रीत किया सुख ना मोरी सजनी जोगी मिंत न कोइ
रातिदिवस कल नाहिं परत है तुम मिलियां बिनि मोइ
ऐसी सूरति या जग मांहीं फेरि न देखी सोइ
मीरा के प्रभु कब रे मिलोगे मिलियां आणंद होइ

## ३४

करना फकीरी तो क्या दिलगीरी सदा मगन मन रहना रे
कोई दिन बाडी तो कोई दिन बंगला कोई दिन जंगल रहना रे
कोई दिन हाथी कोई दिन घोडा कोइ दिन पांवो से चलना रे
कोई दिन गद्दी कोई दिन तकिया कोई दिन भोय मे पडना रे
कोई दिन खाना तो कोई दिन पीना कोई दिन भूखा ही मरना रे
कोई दिन पहना तो कोई दिन ओढा कोई दिन चिथरा पैरवा रे
मीरा कहै प्रभु गिरिधर नागर ऐसा कंता करना रे

### ३३

या जोग्याशीं जडतां प्रीती दुःखच भाळीं येई
जडतां प्रीती सुख कुठलें गऽ जोगि कुणाचा नाहीं
तुझ्या मीलनावांचुन चैन न रात्रंदिवस जराही
पाहियली नच मूर्ती ऐसी पुन्हा जगांत कधींही
मीरेच्या हरि कधीं भेटशिल? मीलनांत सुख होई

### ३४

हवि जर फकिरी कशा दिलगिरी सदा मग्न मना राही रे
कधिं वाडी तर कधीं बंगला जंगलांत कधिं राही रे
कधिं हत्ती कधिं घोडा तर कधिं चालायाचें पायीं रे
कधिं गादी कधिं तकिया तर कधिं नीज भुईवर घेई रे
कधिं खाणें कधिं पिणें तर कधीं जीव भुकेनें जाई रे
कधीं वसन कधिं चादर तर कधिं अंगीं लक्तर लेई रे
मीरा म्हणे प्रभु गिरिधर ऐसा स्वामी करुनी घेई रे

## ३५

वाल्हा मै वैरागिण हूंगी हो
जो जो भेख म्हांरो साहिब रीझै सोइ सोइ धरूंगी हो
सील संतोष धरूं घट भीतर समता पकड रहूंगी हो
जाको नाम निरंजन कहि ताको ध्यान धरूंगी हो
प्रेम प्रीत सूं हरिगुण गाऊं चरणन लिपट रहूंगी हो
या तन की मैं करू कींगरी रसना नाम रटूंगी हो
मीरा कहे प्रभु गिरिधर नागर साधो संग रहूंगी हो

## ३६

मैं तो राजी भई मेरे मन में
मोहिं पिया मिले इक छन में
पिया मिल्या मोहिं किरपा कीन्ही
दीदार दिखाया हरिने
सतगुरु शब्द लखाया अंसरी
ध्यान लगाया धुन में
मीरा के प्रभु गिरिधर नागर
मगन भई मेरे मनमें

## ३५

सखया, मी बैरागिण होइन रे
जो जो वेष रुचे स्वामीला तो तो अंगीं लेइन रे
भरुनि घटीं संतोष, शील मी समता धरुनी राहिन रे
नाम निरंजन ज्याचें त्याला मी ध्यानांतुन ध्याइन रे
प्रेमभक्तिनें गाइन हरिगुण, चरणां बिलगुनि राहिन रे
या देहाची करून किनरी नाम तुझें मी गाइन रे
मीरा म्हणे प्रभु गिरिधर नागर साधूंसंगें राहिन रे

## ३६

मी मनांत हरिखुनि गेलें ग
सखि क्षणांत हरिची झालें ग
लाभे प्रियकर : कृपाच मजवर
दर्शन हरिनें दिधलें ग
सद्गुरु शब्द ठसविला हृदयीं
ध्यानमग्न मज केलें ग
मीरेचा प्रभु गिरिधर नागर
मी माझ्यांतच बुडलें ग

## ३७

बादल देख डरी हो स्याम मैं बादल देख डरी
काली पीली घटा ऊमडी बरस्यौ एक घरी
जित जाऊं तित पाणी पाणी हुई भूमि हरी
जाका पिय परदेस बसत है भीजूं बहार खरी
मीरा के प्रभु हरि अविनासी कीज्यौ प्रीत खरी

## ३८

सुनी हो मैं हरि आवन की आवाज
म्हेल चढ चढ जोऊं मेरी सजनी कब आवैं महाराज
दादुर मोर पपइया बोलै कोइल मधुरे साज
उमंग्यो इंद्र चहूं दिस बरसै दामिण छोडी लाज
धरती रूप नवा नवा धरिया इंद्र मिलण कै काज
मीरा के प्रभु गिरिधर नागर बेग मिलो महाराज

▦ ३७

घन बघुनी बावरी श्याम मी
काळे काळे मेघ बरसती; संतत झरत सरी
जिकडेतिकडे पाणी; धरणी हिरवें रूप धरी
भिजत बघे परदेशपंथ ती सजण जिचा न घरीं
मीरेचा प्रभु हरि अविनाशी जडुं दे प्रीत खरी

▦ ३८

येइ हरि : ऐकियला आवाज
चढुनि महालीं बघतें सजणी, कधिं येतिल महाराज
मंडुक, मोर नि चातक बोलत, कोकिळ करि स्वरसाज
मेघराज चहुंदिशीं बरसतो : सोडी बिजली लाज
मेघमीलना वसुंधरा ही धरी रूप नव आज
मीरेचा प्रभु गिरिधर : जवळी घ्या वेगें महाराज

## ३९

सखी री मोहिं लाज बैरिन भई
चलत लाल गोपाल के संग काहे नाहीं गई
कठिन क्रूर अक्रूर आयो साजी रथ कहं नई
रथ चढाय गोपाल लैगो हाथ मींजत रई
कठिन छाती स्याम बिछुरत बिदरि क्यूं ना गई
दासी मीरा लाल गिरिधर बिरह तें तन तई

## ४०

मै बिरहणी बैठी जागूं
जगत सब सोवै री आली
बिरहणी बैठी रंगमहल में
मोतीयन की लड पोवै
इक बिरहिणी हम ऐसी देखी
अंसुवन की माला पोवै
तारा गिन गिन रैण बिहानी
सुख की घडी कब आवै
मीरा के प्रभु गिरिधर नागर
मिलके बिछुड न जावै

## ३९

सखे, मम लाजच झाली वैरिण ग
जातांना गोपाळ कां न मी गेलें त्याच्या मागुन ग !
कां न बोललें क्रूर अक्रुरा तो येतां रथ सजवुन ग
हातच चोळित हाय बैसलें : जाय तया रथ घेउन ग
हृदय कठिण हें वियोग होतां कां नच गेलें भंगुन ग
दासी मीरा गिरिधर लाला विरहें शिणलें तनमन ग

## ४०

मी विरहिणि ग जागत बसलें
जग सगळें निजलें असतां
रंगमहालीं कुणी विरहिणी
मौक्तिकहार दिसे करितां
एक विरहिणी अशी पाहिली
अश्रूंची माला रचितां
तारे मोजित रात्र कंठिली
वाट सुखाची त्या बघतां
मीरेचा प्रभु गिरिधर ! टाकुनि—
जाउं नका मीलन घडतां

## ४१

अंखिया हरिमीलनकी प्यासी
आप तो जाय द्वारिका छाये
लोक करत मेरी हांसी
आम की डार कोयलिया बोलै
बोलत सब्द उदासी
मेरे तो मन ऐसी आवे
करवत लेहों कासी
मीरा के प्रभु गिरिधर लाल
चरण कंवल की उदासी

## ४२

नींद नहीं आवे जी सारी रात
करवट लेकर सेज टटोलूं
पिया नहीं मेरे साथ
सगरी रैन मोहे तरफत बीती
सोंच सोंच जिया जात
मीरा के प्रभु गिरिधर नागर
आज भयो परभात

## ४१

नयनां हरिमीलन ही प्यास
तूं जाउनि द्वारकेंत बसशी
करिति लोक माझा उपहास
आम्रतरूच्या शाखेवरुनी
कोकिळ गाई गीत उदास
मनिं येतें कीं काशिस जाउनि
गळ्यास लावुनि घ्यावा फांस
मीरेच्या प्रभु गिरिधर लाला
पदकमलांची मजला आस

## ४२

नीज नच येई सारी रात
अशी कुशीवर तळमळतें मी
नाहीं सजण घरांत
तळमळण्यांतच रात्र ओसरे
जाय जीव झुरण्यांत
मीरेचा प्रभु गिरिधर नागर
झाली आज प्रभात
नीज नच येई सारी रात

## ४३

सखी मेरी नींद नसानी हो
पिय को पंथ निहारत सिगरी रणै बिहानी हो
सब सखियन मिलि सीख दई मन एक न मानी हो
बिनि देख्या कल नांहि पडत जिय ऐसी ठानी हो
अंग छीन व्याकुल भई मुख पिय पिय बानी हो
अन्तर बेदन बिरह की वह पीड न जानी हो
ज्यूं चातक घन कूं रटै, मछरी जिमि पानी हो
मीरा व्याकुल बिरहिणी सुधबुध बिसरानी हो

## ४४

पियाजी म्हांरे नैणां आगे रहज्यो जी
नैणां आगे रहज्यो म्हांने भूल मत जाज्यो जी
भौसागर मैं बही जात हूं बेगां म्हांरी सुध लीज्यो जी
राणाजी भेज्या बिख का प्याला सो इमिरित कर दीज्यो जी
मीरा के प्रभु गिरिधर नागर मिल बिछुडन मत कीज्यो जी

## ४३

सखे, मम गेली नीज उडून ग
वाट प्रियाची बघतां गेली सगळी रात्र सरून ग
समजावियलें सर्व सख्यांनीं : हृदय न घे ऐकून ग
घोकितसे मन पडेल चैन न हरि दिसल्यावांचून ग
जपत बैसलें नांव प्रियाचें कृशान्याकुळ होऊन ग
विरहवेदना उरीं : कुणीही व्यथा घे न जाणून ग
ओढ जशी चातका घनाची, मत्स्य जळावांचून ग
मीरा व्याकुळ विरहिणि गेली शुद्धबुद्ध विसरून ग

## ४४

प्रिया मम नयनांपुढतीं राही रे
नयनांपुढतीं राही, मजला कधीं न विसरुनि जाई रे
भवसागरिं मी वाहत जातें : तार मला लवलाही रे
राणाजीनें विष पाठविलें : अमृत करुनी देई रे
मीरेच्या प्रभु मीलन होतां टाकुं नकोस कधींही रे

## ४२

बदरा रे तूं जल भरि ले आयो
छोटी छोटी बूंदन बरसन लागी कोयल सबद सुनायो
गाजै बाजै पवन मधुरिया अंबर बदरां छायो
सेज संवारी पिय घर आये हिलमिल मंगल गायो
मीरा के प्रभु हरि अविनासी भलो जिन पायो

## ४६

थे तो पलक उघाडो दीनानाथ मै हाजिर नाजिर कब की खडी
साजनियां दुसमण होय बैठ्या सबने लगूं कडी
तुम बिन साजन कोई नहीं है डिगी नाव मेरी समंद अडी
दिन नहीं चैन रैण नहिं निंदरा सूखूं खडी खडी
बान बिरह का लग्या हिये में भूलूं न एक घडी
पत्थर की तो अहिल्या तारी बन के बीच पडी
कहा वोझ मीरा में कहिये सौ पर एक धडी

## ४५

घना रे, येसी तूं जल भरुनी
इवलेइवले थेंब बरसती, कोकिळगीतहि ये श्रवणीं
वाजतगाजत मधुर पवन हा, घन दाटुनि आले गगनीं
शेज सजविली, सजण घरीं ये, मंगल गीत जुळे मिळुनी
मीरेचा हरि अविनाशी ज्यां मिळे धन्य ते या भुवनीं

## ४६

उघडा लोचन दीनानाथ : उभी मी कधिंची बघतें वाट
सख्या वैरिणी झाल्या : सलतें सगळयांच्या डोळ्यांत
कुणी न सजणा तुजविण : अडली नाव खोल पाण्यांत
दिवसा चैन न, नीज न रात्रीं : सुकतें वाट पहात
विसर पडे नच घडिभर, लागे विरहबाण हृदयांत
अहिल्येस तारिसी पडे जी शिळा बनुनि रानांत
शंभर भार असे असतांना मीरा जड का त्यांत ?

## ४७

माई मैं तो लियो रमैयो मोल
कोई कहे छानी कोई कहे चोरी लियो है बजंता ढोल
कोई कारो कोई कहे गोरो लियो है मैं आँखी खोल
कोई कहै हल्का कोई कहै भारी लियो है तराजू तौल
तनका गहना मैं सब कुछ दीन्हा दिणे है बाजुबंद खोल
मीरा के प्रभु गिरिधर नागर पुरब जनम का है कौल

## ४८

जागो बन्सीवारे ललना जागो मोरे प्यारे
रजनी बीती भोर भयो हे घर घर खुले किंवारे
गोपी दही मथत सुनियत है कंगना के झनकारे
उठो लाल जी भोर भयो है सुरनर ठाढे द्वारे
ग्वालबाल सब करत कुलाहल जयजय सबद उचारे
माखन रोटी हाथ मे लीनी गउवन के रखवारे
मीरा के प्रभु गिरिधर नागर सरण आया कूं तारे
जागो बन्सीवारे ललना जागो मोरे प्यारे

## ४७

घेतला हरी मोल देऊन
चोरि, लबाडि म्हणोत कुणि : घेतला ढोल बडवून
काळा-गोरा म्हणो : घेतला पूर्ण नेत्र उघडून
हलका वा जड म्हणो : घेतला तराजूंत तोलून
सर्व दागिने विकिले, दिधले बाजुबंद खोलून
मीरेचा प्रभु ! पूर्वजन्मिचा कौलच हा समजून
घेतला हरी मोल देऊन

## ४८

जागा हो बन्सीधर लाला, जागा होइ प्रिया रे
सरे रात, हो प्रभात : जागीं घरें, सर्व दुनिया रे
गोपी दहिं घुसळती : कंकणें किणकिण ध्वनि करितात
पहाटलें, हो जागा लाला, सुरनर बघ दारांत
गोपबाळ कोलाहल करिती तुझिया जयजयकारें
करीं घेउनी लोणिभाकरी सज्ज जाहले सारे
मीरेचा प्रभु गिरिधर नागर, शरण तुला सदया रे
जागा हो बन्सीधर लाला, जागा होइ प्रिया रे

४९

चलो मन गंगा जमना तीर
गंगा जमना निरमल पानी सीतल होत सरीर
बन्सी बजावत गावत कान्हो संग लिया बलवीर
मोर मुगट पीतांबर सोहै कुंडल झलकत हीर
मीरा के प्रभु गिरधर नागर चरणकमल पै सीर

५०

कोई स्याम मनोहर ल्योरी सिर धरैं मटकिया डोलै
दधि को नांव बिसर गइ ग्वालन 'हरिल्यो, हरिल्यो' बोलै
मीरा के प्रभु गिरधर नागर चेरी भई बिनमोलै
कृष्णरूप छकी है ग्वालनि औरहि औरै बोलै

४९

चल मना गंगा-यमुना-तीरा
गंगायमुना निमळ पाणी शीतळ करित शरीरा
मुरली छेडित गाइ कन्हैया, घेइ सवें बलवीरा
हीरककुंडल, मोरमुकुट, पीतांबर शोभे न्यारा
मीरेचा प्रभु, पद्कमलीं शिर ठेवियलें मज तारा

५०

कुणि श्याम मनोहर घ्या रे, शिरिं घडा धरुनिया डोले
नांव दह्याचें विसरुनि गौळण 'हरि घ्या, हरि घ्या' बोले
गिरिधर प्रभुची दासी मीरा अमोलपण तिज आलें
हरिच्या रूपें उन्मद गौळण भलतेंसलतें बोले

## ५१

होजी हरि कित गये नेह लगाय
नेह लगाय मेरो मन हर लीयो रसभरी टेर सुनाय
मेरे मन में ऐसी आवै मरूं जहर बिस खाय
छाडि गये बिसवासघात करि नेह केरीं नाव चढाय
मीरा के प्रभु कब रे मिलोगे रहे मधुपुरी छाय

## ५२

नैणा लोभी रे बहुरि सके नहिं आइ
रूमरूम नखसिख सब निरखत ललकि रहे ललचाइ
मै ठाडी ग्रिह आपणेरी मोहन निकसे आइ
बदन चंद परकासत हेली मंद मंद मुसकाइ
लोक कुटंबी बरजि बरजही बतियां कहत बनाइ
चंचल निपट अटक नहिं मानत परहथ गये बिकाइ
भली कहौ कोइ बुरी कहौ मै सब लई सीस चढाई
मीरा कहे प्रभु गिरिधर के बिनि पलभरि रह्यो न जाई

## ५१

अहो, हरि जाय जीव लावून
जीव लावुनी हरिलें हें मन मधुर शब्द गाऊन
मनांत येतें मरून जावें जहरी विष खाऊन
प्रेमाच्या नौकेंत चढवुनी त्याग करी फसवून
मीरेशीं कधि मीलन ? बसशी मथुरेला जाऊन

## ५२

नयन लोभी रे, येती नच परतून
रोमरोम नखशिखान्त निरखित, मोहुनि बसति खिळून
उभी घरीं मी माझ्या होतें : मोहन येइ पुढून
वदनचंद्र झळके : मज पाही मंद मंद हांसून
लोककुटुंबी नांव न घेती परत परत हिणवून
अटक न चंचल नयनां; विकलें दुसऱ्याच्या हातून
निंदा वंदा : शिरीं धरियलें सर्व वंद्य समजून
हरिविण मीरा क्षणभरही नच राहिल जीव धरून

## ५३

जोगिया जी छाइ रह्या परदेस
जबका बिछड्या फेर न मिलिया बहोरि न दियो संदेस
या तन ऊपरि भसम रमाऊं खोर करूं सिर केस
भगवा भेख धरूं तुम कारण ढूंढत च्यारूं देस
मीरा के प्रभु राममिलन को जीवनि जनम अनेस

## ५४

रामनामरस पीजै मनुआ रामनामरस पीजै
तज कुसंग सतसंग बैठ नित हरिचरचा सुण लीजै
काम क्रोध मद लोभ मोह को चित से बहाय दीजै
मीराके प्रभु गिरिधर नागर ताहि के रंग मे भीजै

▦ ५३

जोगि हा हाय जाय परदेश
विरह घडे, नच भेट पुन्हा, हा पाठविना संदेश
भस्म फासुनी देहावर, मी वपन करिन हे केश
घेइन भगवा वेष तुझ्यास्तव धुंडित चारी देश
जगेल मीरा जन्मजन्म भेटण्या राम हृदयेश

▦ ५४

मना रे, रामनामरस प्यावा
कुसंग त्यजुनी संतसंग धरि श्रवणीं हरिच वसावा
कामक्रोधमदमोह षड्रिपू हृदयांतून खुडावा
मीरेचा प्रभु गिरिधर : त्याच्या रंगीं जीव भिजावा

## ५५

भवनपति तुम घरि आज्यो हो
बिथा लगी तन माहिने तपत बुझाज्यो हो
रोवत रोवत डोलांत सब रैण बिहावै हो
भूख गई निंदरा गई पापी जीव न जावै हो
दुखिया को सुखिया करो मोहि दरसण दीजै हो
मीरा व्याकुल विरहिणी अब बिलम न कीजै हो

## ५६

दरसबिन दूखण लागै नैण
जब के तुम बिछुरे प्रभु मोरे कबहुं न पायो चैन
सबद सुणत मेरी छतिया कांपै मीठे मीठे बैन
बिरहकथा कासूं कहूं सजनी बह गइ करवत ऐन
एक टकटकी पंथ निहारूं भई छमासी रैण
मीरा के प्रभु कब रे मिलोगे दुख मेटण सुख दैण

५५

भवनपति या हो तुम्ही घरीं
विझवा सगळा दाह : लागली आग असह्य उरीं
रात्र संपली झरतां संतत नयनीं अश्रुसरी
भूकनीज गेली; पापी हा जाय न जीव तरी
दुःखी जीवन दर्शन देउन देवा सुखी करी
मीरा व्याकुळ विरहिणि : आतां नको विलंब हरी

५६

नाहीं दर्शन : दुखले लोचन
विरह तुझा प्रभु घडला जेव्हां, चैन पडेना तेव्हांपासुन
हृदय थरथरे आठवतां मज तुझें हरी रे तें मधु भाषण
विरहकथा सखि कुणास सांगूं? असह वेदना जाय दुभंगुन
सहा मास जणुं रात्र पसरली : वाट पाहतें डोळे खिळवुन
मीरेच्या प्रभु कधीं भेटशिल सुख द्याया रे दुःख संपवुन

## ५७

गोहनें गुपाल फिरूं ऐसी आवत मन में
अवलोकत बारिज बदन बिबस भई तन में
मुरली कर लकुट लेऊं पीत बसन धारूं
काछी गोप भेष मुकट गोधन संग चारूं
हम भई गुलफामलता वृन्दावन रैनां
पसु पंछी मर्कट मुनी श्रवन सुनत बैनां
गुरुजन कठिण कानि कासों री कहिए
मीरा प्रभु गिरिधर मिलि ऐसे ही रहिए

## ५८

तनक हरि चितवौजी मोरी ओर
हम चितवत तुम चितवत नाहीं दिल के बडे कठोर
मेरे आसा चितवनि तुमरी और न दूजी दोर
तुमसे हमको कब रे मिलोगे हमसी लाख करोर
उभी ठाढी अरज करत हूं अरज करत भयो भोर

▦ ५७

येइ मनीं माझ्या मी हरिसवें फिरावें
कमलवदन देहभान हरुनिया पहावें
अंगीं पीतांबर, करिं पावा अन् काठी
गोप बनुनि हिंडावें गाईच्या पाठीं
वृंदावनिं मी सुंदर कुसुमलता झालें
पशुपक्षी, मुनि यांचे शब्द श्रवणिं आले
ते गुरुजनशब्द कसे सांगूं मी बाई
मीरेच्या प्रभु असाच दृढ जवळी राही

▦ ५८

क्षण तरी हरी मजकडे पाही
मी बघतें, पण कठोर हा नच टाकी नजर जराही
कृपादृष्टिची एकच आशा : दुजी न उरली कांहीं
मजसम जगिं या लाखकरोडों : सांग भेट कधि होई
उभी राहुनी करितें आर्जव : होय पहाट पहा ही

## ५९

गली तो चारों बंद हुई मैं हरिसे कैसे मिलूं जाय
उंची नीची राह रपटीली पांव नहीं ठहराय
सोच सोच पग धरूं जतन से बार बार डिग जाय
उंचा नीचा महल पिया का हमसे चढ्या न जाय
पिया दूर पंथ म्हारो झीणो सुरत झकोला खाय
कोस कोस पर पहरा बैठ्या पैंड पैंड बटमार
हे बिधना कैसी रच दीन्हीं दूर बस्यो म्हारो गाय
मीरा के प्रभु गिरिधर नागर सतगुरु दई बताय
जुगन जुगन बिछडी मीरा घर में लीन्ही आय

## ६०

सावण दे रह्या जोरा रे घर आयो जी स्याम मोरा रे
उमड घुमड चहुंदिस से आया गरजत है घन घोरा रे
दादुर मोर पपीहा बोलै कोयल कर रही सोरा रे
मीरा के प्रभु गिरिधर नागर ज्यो वारूं सोहि थोरा रे

## ५९

चारी वाटा बंद : हरीची भेट कशी मी घेऊं
वाट निसरडी : पाय ठरेना : पुढें कशी मी जाऊं
जपुन जपुन टाकियलें पाउल पुन्हां पुन्हां डगमगलें
उंचावरतीं त्याचें घर : मी चढणीवर तगमगलें
दूर राहिला माझा प्रियकर : जेथें दृष्टि पडेना
सूक्ष्म मार्ग तिकडे जाण्याचा : जेथें ध्यान जडेना
लूटमार हो वाटेवरती, कोसावरति पहारा
दूर राहिला गांवहि माझा : दैव देइना थारा
मीरेचा प्रभु गिरिधर नागर सद्गुरुदर्शन दे रे
युगायुगांची विरही मीरा घरीं आपुल्या ने रे

REFBK-0014822
REFBK-0014822

## ६०

श्याम घरीं ये : बरसे बरसे श्रावण हा घनघोर
भरुन भरुन ये गगन, दाटले मेघहि काळेभोर
मंडुक चातक कोकिळ गाती, हाक घालितो मोर
मीरा जें देइल तें थोडें : चरण हरीचे थोर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.